# गारुड

अतुलकडे आज रात्री त्याचे काही जवळचे मित्र सहकुटुंब जेवायला यायचे होते. Thanksgiving चा लाँग वीकेंड होता. अमेरिकेत हा वीकेंड हा एक जिव्हाळ्याचा सण म्हणून साजरा होतो. जवळचे व लांब रहाणारे सगळे कुटुंबिय एके ठिकाणी जमून पार्टी करतात. या पार्टीला मुख्य डिश स्टफ टर्कीची असते. त्याशिवाय अनेक खास पदार्थ स्पेशल ड्रिंक्स इत्यादिंनी पार्टी रंगते. देश तसा वेष म्हणून अतुल व त्याचे मित्र देखिल हा लाँग वीकेंड फॅमिली नाईट म्हणून मजेत घालवायचे. नाहीतरी परदेशात मित्रच कुटुंबिय असतात. यंदा अतुलकडे जमायचे ठरवले होते. सुदैवाने बाबा पण आले होते. अतुल खुशीत होता. त्याची स्टफ टर्की छान व्हायची. तो त्या कामात व्यग्र होता. लता त्याची पत्नी बाकीच्या गोष्टीकडे लक्ष देत होती. मिनी व चिन्मय आपल्या सवंगड्यांची वाट पहात होते. "अगं सूनबाई मला पण हे सर्व करायची सवय आहे. तुझ्या मदतीला हा हरकाम्या तयार आहे." असे बाबा तिला सांगत होते पण ती हसून म्हणाली, "मला मदत नको आहे. बाबा तुम्ही आराम करा." बाबाना खरेच सर्व घरकामाची माहिती होती. बरोबरच आहे, कारण अतुल दहावीत व अजय सातवीत असताना शारदा त्यांची प्रिय पत्नी या लाडक्या दोन मुलाना त्यांच्या हाती सोपवून देवाघरी गेली .त्यानंतर या मुलांचे संगोपन व आपले ऑफिस या व्यतिरिक्त त्याना काही दिसलेच नाही. मुलांनी पण बापाचे पांग फेडले. उत्तम डिग्री मिळवून अतुल अमेरिकेत सेटल झाला. तर डॉक्टर म्हणून अजय इंग्लंडला गेला आणि तिथेच राहिला. तिकडे गेलेल्या भारतीय डॉक्टर बरोबर लग्न करून त्याने तिथेच संसार थाटला. बाबा म्हणजे शरद आताच त्याच्याकडे राहून अतुलकडे आला होता. त्याला दीड महिना झाला होता आणि आता भारतात परतावे असा विचार करत होता. अतुलला वाटत होते की त्याने अमेरिकेचे नागरिकत्व घेतले आहे तर बाबानेही ग्रीन कार्ड घेऊन इकडेच रहावे. आता एकट्याने भारतात राहू नये, पण शरद त्याला तयार नव्हता.

एव्हढी वर्षे त्याचे आयुष्य त्याचे नव्हतेच. केवळ मुले हेच त्याचे लक्ष्य होते. त्यांचा अभ्यास, त्यांचे करिअर, त्यांचे आरोग्य यात तो पूर्ण गुरफटून गेला होता. घरात घरकामाला, स्वैपाकाला बाई होत्या पण तो स्वत: सगळीकडे लक्ष ठेवून असे. वेळ पडली तर त्याने स्वत: महिना महिना स्वैपाकघर सांभाळले होते. आता दोघे परदेशी गेल्यामुळे त्याला खूप मोकळा वेळ मिळू लागला. त्याने रिटायर होईपर्यंत नोकरी सोडायची नाही हे ठरवलेच होते. नाटके बघायची, साहित्यचर्चा, सभा, व्याख्याने यांना जायचे तसेच देश विदेश फिरून  बघायचे, अशा कार्यक्रमात स्वत:ला गुंतवून घेतले. नविन नविन गोष्टी शिकण्याचा उद्द्योग सुरू केला त्यामुळे इथे अतुलकडे नुसता आरामात वेळ घालवायला त्यांना आवडत नव्हते. कारण इथे बाकी सर्वजण आपापल्या कामात सबंध दिवस घराबाहेर असत. त्याने अतुलला हे समजावले त्यामुळे त्याने बाबांना इथे रहायचा आग्रह केला नाही. पण आवर्जून

सांगितले की बाबा जेव्हा या सर्व गोष्टीतून तुमचे मन उतरेल आणि तुम्हाला एकटेपण वाटेल तेव्हा सरळ उठून इकडे यायचे. आम्ही सगळे तुमची वाट पहात आहोत हे लक्षात ठेवा.

अतुलला समीरचा फोन आला. अतुलने विचारले "कायरे संध्याकाळी येतो आहेस ना, कशाला फोन केलास?" समीर म्हणाला "माझ्या मावसभावाची आत्या त्याच्याकडे त्याच्या बायकोच्या बाळंतपणासाठी मदतीला आली होती. ती परवाच माझ्याकडे आठ दहा दिवस रहायला आली आहे आणि इकडूनच ती मुंबईला जाणार आहे. तर ती पण आमच्याबरोबर असेल चालेल ना?"
"अरे वेडा की काय तू? अरे तुझी पाहुणी ती माझी पाहुणी आणि थँक्सगिविंग ला जेव्हढे कुटुंबिय एकत्र येतील तेव्हढे चांगले. पण कायरे बाळंतपणात मदतीला आत्या कशी आली? तिची किवा त्याची आई कशी नाही आली?"
समीरने म्हटले "अरे पहिल्या बाळंतपणात तिची आई आली होती नंतर माझी मावशी पण येऊन गेली. पण यावेळी तिची आई आजारी आहे व माझ्या मावशीलाही शक्य नव्हते. ही आत्या अविवाहित असून तिने ह्या मुलांचे लहानपणापासून स्वत:च्या मुलाप्रमाणे लाड केलेत. तेव्हा यावेळी तिला बोलावले माझ्या भावाने."

पार्टी छान झाली. सर्व समवयस्क मजेत गप्पा गोष्टी करण्यात व खेळण्यात रमले होते. बाबा कशाला तरी स्वैपाकघरात गेले होते, तेव्हढ्यात तिथे शीलाआत्या आली. तिला पाणी हवे होते. बाबानी तिला पाणी दिले व सहजच विचारले तुम्ही भारतात रहायला कुठे? तर ती म्हणाली मुंबईत दादरला. आपण कुठे ? बाबा म्हणाले माहीमला. दोघाना गंमत वाटली. भारतात मुंबईत एव्हढी वर्षे इतक्या जवळ राहून इथे परक्या देशात अमेरिकेत भेटतो आहोत. मग तिथल्या गोष्टी, मराठी नाटके, शिवसेना मनसे मराठी राजकारण इत्यादी अनेक गोष्टीवर चर्चा झाली. शीला आत्या बँकेत नोकरी करत होती. बाबा नुकतेच स्टेट बँकेतून रिटायर्ड झाले होते. मुले आपल्या रंगात होती. या दोघांचा वेळ सुध्दा गप्पा मारण्यात छान गेला. रात्री दोन वाजता सर्वजण आपापल्या कबिल्यासह मार्गस्थ झाले. एकंदर समारंभ छान झाला.

आठदहा दिवसांनी बाबांची निघायची तयारी झाली. लता अतुलला म्हणाली, “बाबा तिथे एकटेच असतात. इथले लोक कसे परस्परांच्या सोई संमतीने पुनर्लग्न करतात. कंपॅनियन म्हणून रहातात. आपले विचार कृती समजून घ्यायला, चर्चा करायला बरोबर कोणीतरी असते. हल्ली आपल्याकडेही थोड्या प्रमाणात या गोष्टी येत आहेत. ती शीला आत्या आपल्याकडे आली होती ती अजून अविवाहित आहे. बाबा व ती किती छान गप्पा मारीत होते. दोघांनी एकत्र यायचा विचार केला तर किती बरे होइल. आपण समीरकडे याबाबत बोलूया का?” अतुलला लताचे विचार पटले. त्याने समीरला फोन केला. समीरला पण कल्पना आवडली. त्याने आपल्या मावसभावाचे मत घेतले. सर्वांनीच ही कल्पना

उचलून धरली. मग दोघे एकत्र येतील असा पहिला प्लान ठरला. शीला आत्या व बाबांचे परतीचे तिकिट एकत्रच काढले गेले ते दोघांच्या नकळतच. विमानतळावर सगळे आश्चर्यचकितपणे भेटले व दोघांना टाटा केला.

अतुलने बाबा घरी पोचल्यावर फोन करून प्रवास कसा झाला याबद्दल चौकशी केली ती नेहमी प्रमाणेच. बाबा म्हणाले, प्रवास छान झाला. त्या शीला आत्याही त्याच प्लेनमधे होत्या. त्यांची सीट मझ्या जवळच होती त्यामुळे गप्पात वेळ चांगला गेला. अतुलला मजा वाटली. इकडे शीला आत्याला समीरचा फोन गेला कारण ती त्याच्याकडून मुंबईला रवाना झाली होती. तिने पण शरदरावांची कंपनी मिळाली त्यामुळे प्रवास कंटाळवाणा झाला नाही असे सांगितले. त्यानंतर शीलाचे व बाबांचे एकत्र येणे मनवले. मावशीने बाबांना मुद्दाम त्यांच्याकडे चहाचे आमंत्रण दिले. बाबांनी पण त्या कुटुंबाला आपले घर बघायला बोलावले. ओळख वाढली. हळू हळू शीला व शरद एकमेकांना भेटू लागले. कधी एकत्र नाटक सिनेमाला तर कधी एखाद्या गाण्याच्या कार्यक्रमाला. शीलाला शरदबद्दल आपलेपणा वाटू लागला. तिचे आतापर्यंतचे आयुष्य भावंडांच्या मागेच गेले होते.

ती ग्रॅज्युएट होऊन बँकेत नोकरीला  लागली आणि वडील अचानक ॲक्सिडेंट मध्ये गेले. त्या शॉकने आई अंथरुणाला खिळली ती उठलीच नाही. मागचा भाऊ इंजिनिअरिंगच्या दुस-या वर्षाला व धाकटी बहीण S.S.C.ला. शीलाने मन घट्ट केले. व त्यांचे शिक्षण आणि लग्नकार्य होईपर्यंत दुस-या कशाचाच विचार केला नाही. तोपर्यंत स्वत:चे आयुष्य फुलवायची वेळ निघून गेली. तिचा विचार कोणी केला नाही. तिच्यासाठी कोणी पुढे आले नाही. भावंडे लहान आणि नातेवाइक लांब आणि उगाच पैशाची तोशीस पडली तर. रोजच्यासारखे जीवन पुढे सरकत होते. ती सर्वांपासून अलिप्त आपल्यातच असायची. अपेक्षा केली नाही की उपेक्षेचा त्रास होत नाही. आताच अमेरिकेहून आल्यावर जीवनात एक वेगळी वाट दिसत होती. पण शरदला ही वाट जोडायला आवडेल का असा विचार तिच्या मनात गोंधळ घालत होता. आतापर्यंत ती तिची स्वामिनी होती. तिच्या मनाप्रमाणे तिचा जीवनक्रम चालला होता. आपल्या जीवनात दुसरा कोणी आला तर दोघांचे जीवन सुखदपणे जगायला परस्पराना जमवून घेण्याची नितान्त गरज असणार. हे आपल्याला जमेल का? आता तर लग्नाचे वयही उलटून गेले. शरिराला पुरुषाची ओढ वाटेल का याची तिला अजिबात खात्री नव्हती. पण वहिनीच्या आग्रहामुळे तिने तो विचार करायचे ठरवले आणि एक दिवस तिने शरदला याबद्दल विचारले.

शरदला त्याची शारदा गेल्यापासून स्वतंत्रपणे जगण्याची सवय झाली होती. त्याची मुले व त्यांचे हित यावर त्याच्या सा-या गोष्टी अवलंबून असत. आणि त्याबद्दल दुसरा कोणीही अधिक चांगला विचार करू शकत नाही अशी त्याची खात्री होती म्हणुन तर सगळ्यानी परत परत आग्रहाने सांगूनही तो दुस-या लग्नाच्या फंदात पडला नाही. मुलांसाठी त्याने आई व बाबा या दोन्ही भूमिका शंभर टक्के

पार पाडल्या होत्या. आता त्याला स्वत:साठी जगायचे होते. अशा वेळी मनासारखा सोबती मिळाला तर आयुष्य अधिक सुखी होते. पण या वयात मनासारखा जोडीदार मिळणे कठीण वाटते. शीलाबरोबरच्या या नव्या मैत्रीमुळे त्याच्या मनात असा विचार येई पण तिच्या आवडी निवडी आपल्या आवडी निवडींशी जुळल्या नाहीत तर हात दाखवून अवलक्षण तर होणार नाही ना? पण ती समजुतदार वाटते. आतापर्यंत भावंडांसाठी जगत आली आहे त्यामुळे तिला माझ्यासाठी काही करण्यात वावगं वाटणार नाही पण तिलाही आयुष्याच्या या टप्प्यावर असे वाटत असेल, आता माझ्या जबाबदा-या संपल्या आहेत, आता मी फक्त स्वत:साठी जगणार तर माझ्यासाठी तिचे मन मला वळवता येईल का किवा तिच्यासाठी मला मनाला, सवयींना मुरड घालता येईल का? या उलट सुलट विचाराने शरद अस्वस्थ होई.

इथे दोन्ही बाजुला मुले खुष होती. लपून छपून ते या दोघांच्या भेटीचे वृत्त माहीत करून घेत व ते परस्परांना आनंदाने कळवले जाई. अतुलकडून अजयलाही बातमी कळली होती. त्याने शरदला पत्र पाठवले 'बाबा इतक्या वर्षांनी तुम्हाला समवयस्क सुशील सुशिक्षित अशी जोडीदारीण मिळते आहे याचा आम्हाला खूप आनंद झाला. लवकर मनावर घ्या. छोट्याशा लग्नसमारंभासाठी आम्ही सहकुटूंब व-हाडी येणार आहोत. आणि त्यानंतर तुमची स्विट्झर्लंडची ट्रिप ऍरेंज केली आहे. फक्त तारखा कळवा. त्याला मुलांच्या उत्साहाची कमाल वाटली. त्यांचे प्रेम तो जाणून होता. पत्र वाचून त्याला फार गंमत वाटली. अजून कशाचा कशाला पत्ता नाही आणि यांचे पुढचे प्लॅनिंग सुरु. दुसरे काही सुचत नाही. बाबाचा संसार मांडून त्याला सुखी करायचे आहे यांना, वेडे कुठले! त्याच्या मनातील उलट्सुलट विचारांना या पत्राने दिशा दाखवली. त्यातच शीलाने आपली इच्छा बोलून दाखवली. त्याने बराच विचार केला आणि एक दिवस एकत्र घालवू असे ठरवून तिला सकाळीच घरी बोलवले.

शीला उद्या सकाळीच ये. उद्याचा एक दिवस आपण पूर्णपणे एकत्र घालवू असा शरदचा sms वाचून शीलाला जरा विचित्र वाटले. तशी ती एखद्या पुरुषाबरोबर सतत व एकटी कधीच वावरली नव्हती. ती तिच्या बहिणीकडेही कधी रहायला जात नसे कारण बहिणीच्या नव-याचे तिथे मोकळेपणी वागणे पाहून तिला संकोच वाटे. सर्वजण एकत्र असताना ती जेव्हढी मोकळी असे तशी ती एकटी असताना कुठल्याही पुरुषाबरोबर, तो नात्यातला असो वा ऑफिसातला असो मोकळी होऊ शकत नसे. कदाचित तरुणपणातच जबाबदारीचे ओझे अंगावर पडले आणि त्यामुळे मन आवरावे लागले, मारावे लागले. जाणिवा बांधून ठेवाव्या लागल्या. त्यामुळे असेल, ती आपल्याच कोशात राहू लागली. तिची आर्थिक मदत सर्वांना असे पण सांसारिक मदत करणे तिला जमत नसे. तिला निगुतीने स्वैपाकपाणी करणे, घर आवरणे अशा गृहिणीच्या रोजच्या कामाची गरज पडली नाही. सवय लागली नाही. अमेरिकेला सुद्या भाच्याने आग्रह केला म्हणुन ती गेली. पण तिथे तिचा वयाने जाणती एव्हढाच आधार होता, मोठ्या मुलाला ती सांभाळत होती. त्याला गोष्टी सांग त्याच्याबरोबर खेळ या गोष्टी तिला जमत.

बाकी कामात तिचा सहभाग नव्हता. त्यासाठी त्याने एक मदतनीस ठेवली होती. शीला ऑफिस वर्क मधे पूर्ण वाकबदार होती. व्यवस्थित बढत्या मिळवित गेली. आधी पासून स्वैपाकिण व घरकामासाठी दिवसभर बाई होतीच व भावाचे लग्न झाल्यावर वहिनीने घराची जबाबदारी घेतली. शीलाने फक्त आर्थिक भार सांभाळला.

दुस-या  दिवशी सकाळीच शीला शरदच्या घरी आली. शरदने ब्रेकफास्टची तयारी केली होती. ती आल्यावर त्याने छान कॉफी तयार केली व गरम गरम उपमा बशीत भरून टेबलवर ठेवला. व म्हणाला यानंतरचे खाणे पिणे तुम्ही सांगाल त्या प्रमाणे. शीलाच्या पोटात गोळा आला. दोघांनी गप्पा मारत ब्रेकफास्ट संपवला. भांडी मोरीत टाकली. दिवाणखान्याच्या सोफावर बसून टी.व्ही. लावला व बातम्या पाहू लागले. थोड्याच वेळात सखुबाई आली. तासाभरात सर्व काम आटोपून घर स्वच्छ करून ती निघून गेली. दोघांच्या पूर्वायुष्याच्या आठवणीना उजाळा देत त्यानी नवीन आयुष्याबद्दल विचार मांडायला सुरुवात केली. शीला म्हणाली ‘मला घर गृहस्थी म्हणजे घर चालवण्यासाठी गृहिणी जे करते त्याची सवयच नाही. कारण वहिनीच  सर्व बघते. मी फक्त अर्थपुरवठा करणारी बँक ! आता जर ते मला करावे लागले तर ते मला कसे जमणार? शरद म्हणाला शारदा अर्ध्या वाटेवरून निघून गेली. मुले लहान असल्याने मला ते सर्व करण्याची सवय झाली. पण आता मला त्यात लक्ष घालून करण्याचा उत्साह मुळीच उरला नाही. आता ही आयुष्याची बोनस वर्षे मला पूर्ण आरामात काढायची आहेत. तेव्हा आपले पुढे कसे करायचे याचा विचार तुम्ही करा. नंतर जेवणासाठी जवळच्याच हॉटेल मधे गेले. दुपारी वामकुक्षी झाली. शारिरिक जवळकीची इच्छा, असोशी कोणीच दाखवली नाही. तिची साडीची निवड किंवा त्याच्या T-shirt चा रंग याकडे दोघांचे विषेश लक्ष नव्हते. सहजीवनाचा जोडीदार म्हणून या गोष्टींना पण महत्व असते. त्यांच्या गप्पा जास्तीकरून सामान्य विषयावरच होत होत्या. त्यांना कौटुंबिक स्पर्श नव्हता. तिने त्याच्या मुलांबद्दल, त्यांचे लहानपण कसे गेले, आई नसल्याने त्यांना व त्यालाही तिची कमतरता जाणवली असेल. आयुष्य कष्टप्रद व दुखःमय झाले असेल. याबद्द्ल बोलणे सहज योग्य होते. पण तिने त्या बद्दल काहीच विचारले नाही. तिला कदाचित तसे सुचलेच नसावे. शरदने तिच्या भावाबहिणी बद्दल सर्व चौकशी केली. त्यांचे संसार तिने मांडून दिले पण ती त्यात गुंतून राहिली नाही. तिचा अलिप्त भाव, तिच्यासाठी कधी कोणी विचार केला नाही, यातूनही आला असेल. शरदला तिच्याबद्दल वाईट वाटले. संध्याकाळ  झाली. ती म्हणाली, निघते आता आणि ती निघाली. पुढच्या भेटीची असोशी शरदला वाटली नाही व तिनेही काही म्हटले नाही. ती अलिप्तच राहिली. शरदला पुढे काय करावे असा विचार पडला. रात्रभर त्याच्या मनात हाच विचार घोळत होता.

एव्हढ्या वर्षांनी तो मोकळा, स्वत:साठी जगत होता. त्याला जिथे जावे असे वाटेल तिथे जात होता. त्याच्या इच्छेप्रमाणे खाणेपिणे, नाटक, सिनेमा, सहली असे त्याचे आयुष्य मजेत चालले होते. जुन्या

मित्रांशी चांगले संबंध होते. तेही आता जेष्ठ नागरिक, कुटुंब जबाबदारीतून मोकळे झाले होते. त्यांचा छान ग्रुप झाला होता. आता हे नवे नाते जोडून त्यात मन रमेल का? तिच्याबद्दल मला दया वाटते. तिच्यावर आधी परिस्थितीने व नंतर तिच्या घरच्यांनी तिला स्वत:साठी गृहित धरून अन्याय केला आहे. त्यांनी तिच्या भावनांचा, तिचा संसार थाटून द्यायचा कधी विचारच केला नाही. आता तिचे वय वाढत असताना पुढे वृध्दपणी तिची काळजी घ्यावी लागेल या विचाराने हा प्रस्ताव आणला असावा. हा माझा विचार नाही. पण यामुळे तिच्यावर माझी वा माझ्यावर तिची जबाबदारी पडली तर ती घ्यायला आम्हाला जमेल का? आणि महत्वाचे म्हणजे परस्परात तेव्हढी आत्मीयता इतक्या अल्प वेळात निर्माण होइल का? आणि नाही झाली तर, तर हे नाते नकोसा बोजाच होणार. यात दोघांचा काय फायदा? त्यापेक्षा तिचे आयुष्य तिच्या पध्दतीने जगू दे. व मला माझे. माझे इतर मित्र तशीच ही नवी मैत्रिण ! कधीतरी भेटावे, नाटक सिनेमा पहायला कंपनी द्यावी. इतर सर्वांबरोबर तिलाही जेष्ठ नागरिक संघात सामिल करून घ्यावे हे बरे. त्यामुळे तिलाही चार लोकांत, समाजात मिसळायची सवय होईल. तिची सर्वांपासून एकटी रहायची, अलिप्ततेची भावना कमी होईल. तिच्याशी लग्न करून कदाचित तिचे माझे नव्याने जुळलेले मैत्रपण देखील पणाला लागेल. मला वाटते आम्ही दोघे सुखी होण्याऐवजी दुःखी होऊ. त्याचा निश्चय झाला. गेले सहा महिने चालू असलेले गारूड संपले. त्याला शांत वाटले. उद्याच फोन करून तो अतुलला हे सर्व सांगणार होता. त्याच्यात व मुलांच्यात तेव्हढे मोकळेपण होते. शीलालाही तो हेच समजावून सांगणार होता. तिचेही आक्रसलेले शरीर व मन त्यायोगे मोकळे व्हावे अशी त्याची इच्छा होती. वागण्या बोलण्यातला हा मोकळेपणाच त्याच्या आयुष्याचा आनंद होता.

**- नलिनी करंडे**

(बक्षिसपात्र कथा 'अक्षरधन' जान\फेब\मार्च २०१२)